अमरावती येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याकरिता आवश्यक पद निर्मितीबाबत...

# महाराष्ट्र शासन
## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
**शासन निर्णय क्रमांकः क्र.पदनि-२०२३/प्र.क्र.१७७/२३/वैसेवा-२**

गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, ९ वा मजला, लोकमान्य टिळक रोड
नवीन मंत्रालय, मुंबई, ४०० ००१

**दिनांक :- ०६ मार्च, २०२४**

**वाचा :-**

१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र. एमईडी-२०२२/प्र.क्र.२२९/२२/शिक्षण-१, दि.१४.०७.२०२३

२) आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रमांक DMER१२०११/१८/२०२३-EDU, दिनांक १७.१०.२०२३

**प्रस्तावना -**

जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांपेक्षा १००० लोकसंख्येमागे डॉक्टरांचे प्रमाण कमी असल्याने तसेच राज्यात सध्या डॉक्टरांची कमतरता असल्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागातील व सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टरांची बहुतांशी पदे रिक्त आहेत. त्यामुळे राज्याच्या निमशहरी, ग्रामीण, दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेस आरोग्यविषयक प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता तसेच राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधांचा विचार करता अमरावती जिल्हा तुलनेने वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यामागे मागासलेला असल्याने केंद्र शासन व राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून अमरावती येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास मा.मंत्रीमंडळच्या दि.२८.०६.२०२३ च्या बैठकीतील निर्णयानुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दि.१४.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

तसेच सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरिता गट-अ ते गट-ड मध्ये एकूण ४४८ पदांची निर्मिती करण्यास व भरण्यास तसेच त्यापोटी येणाऱ्या रुपये ३४.७० कोटी इतक्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली असून पदनिर्मितीच्या कार्यवाहीस उच्च स्तरीय सचिव समितीच्या मान्यतेची आवश्यकता नाही, असा देखील मा.मंत्रीमंडळाने निर्णय घेतला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरिता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार वर्ष निहाय, आवश्यक पदनाम निहाय पदनिर्मिती आवश्यक असल्यामुळे आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या संदर्भ क्र.२ येथील दि.१७.१०.२०२३ च्या पत्रान्वये सादर केल्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती करिता आवश्यक असलेल्या पदांच्या पदनाम निहाय पदनिर्मितीस मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय :-

अमरावती येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी “विवरणपत्र-अ” नुसार गट-अ ते गट-क मधील नियमित १८५ पदे व विद्यार्थी पदे ५९ त्याचप्रमाणे“विवरणपत्र-ब” नुसार बाह्यस्त्रोताद्वारे घ्यावयाच्या २०४ मनुष्यबळ सेवा अशी एकूण ४४८ पदे चार टप्प्यात निर्माण करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ) “विवरणपत्र-अ” मध्ये नमुद केलेली प्रथम, द्वितीय, तृत्तीय व चतुर्थ टप्यातील पदे टप्पा निहाय मंजूर होणार असून, प्रथम वर्षाबाबतची पदे तात्काळ निर्माण होतील व उर्वरीत द्वितीय, तृत्तीय व चतुर्थ टप्प्यातील पदे प्रती वर्षी निर्माण होतील. त्याचप्रमाणे “विवरणपत्र-ब” बाबत तशीच कार्यवाही करण्यात येईल.

ब) सदर पदांच्या वेतनाकरीता संस्था निहाय लेखाशिर्ष व आहरण संवितरण सांकेतांक मंजूर करुन घेण्यात यावे.

क) पुढील टप्प्याच्या वेतनाची तरतूद संस्थेच्या प्रती वर्षीच्या अंदाजपत्रकात करण्यात यावी.

ड) पुढील टप्प्याच्या पदांचा समावेश प्रतीवर्षी अस्थायी पदांच्या मुदतवाढ प्रस्तावात करण्यात यावा.

२. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या सेवा-९ कार्यासनाने अनौपचारिक संदर्भ क्र.३५/सेवा-९, दि.०२.०२.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०३०६१३००११२७१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAKASH BABAN SURWASE

Digitally signed by PRAKASH BABAN SURWASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=80b7aac85d2bc48d92746fc668ed758d69aeddf95746d0042863b2a0ce71dc1f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6B133E92365A7935768A9BFA0220E77FC95C2726F4A9EB86D8D0C7E623A2B976, cn=PRAKASH BABAN SURWASE
Date: 2024.03.06 16:34:46 +05'30'

**प्रकाश सुरवसे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई, यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

६) मा.मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

७) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

८) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

९) मा.राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१०) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई.

११) अ.मु.स. (वित्त)/अ.मु.स. (लेखा व कोषागारे)/सचिव (वि.सु.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

१२) प्रधान सचिव (वै.शि.) यांचे स्वीय सहायक, मुंबई.

१३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,

१४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

१५) संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.

१६) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक ( ५ प्रती)

१७) जिल्हाधिकारी, अमरावती .

१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

१९) जिल्हा कोषागार अधिकारी,अमरावती

२०) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

२१) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये

२२) ग्रंथपाल, ग्रंथालय, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

२३) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

२४) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

२५) निवडनस्ती (वैसेवा-२)

**शासन निर्णय क्रमांक पदनि-२०२३/प्र.क्र.१७७/२३/वैसेवा-२, दि.०६.मार्च.२०२४ चे सहपत्र**
**अमरावती येथील नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी पदनिर्मितीबाबतचे**

## "विवरणपत्र-अ"

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | चतुर्थ वर्ष | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **गट-अ** | | | | | | | |
| १ | अधिष्ठाता | Academic level-१४ १,४४,२००-२,१८,२०० | १ | ० | ० | ० | १ |
| २ | प्राध्यापक | Academic level-१४ १,४४,२००-२,१८,२०० | ६ | १० | २ | २ | २० |
| ३ | सहयोगी प्राध्यापक | Academic level-१३A १,३१,४००-२,१७,१०० | १७ | ६ | ३ | ० | २६ |
| ४ | मुख्य प्रशासकीय अधिकारी | एस -२० ५६,१००-१,७७,५०० | १ | ० | ० | ० | १ |
| | | **एकूण** | **२५** | **१६** | **५** | **२** | **४८** |
| **गट-ब** | | | | | | | |
| ५ | सहाय्यक प्राध्यापक | Academic level-१० ५७,७००-१,८२,४०० | २४ | १३ | ३ | ० | ४० |
| ६ | सांख्यिकी-नि-अधिव्याख्याता | एस-१५ ४१,८००-१,३२,३०० | ० | १ | ० | ० | १ |
| ७ | प्रशासकीय अधिकारी | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १ | ० | ० | ० | १ |
| ८ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | एस-१६ ४४,९००-१,४२,४०० | ० | २ | ० | ० | २ |
| | | **एकूण** | **२५** | **१६** | **३** | **०** | **४४** |
| **गट-क** | | | | | | | |
| ९ | ग्रंथपाल | एस -१४ : ३८,६००-१,२२,८०० | १ | ० | ० | ० | १ |
| १० | कार्यालयीन अधीक्षक | एस -१४ : ३८,६००-१,२२,८०० | १ | १ | ० | ० | २ |
| ११ | सहायक ग्रंथपाल | एस -१० : २९,२००-९२,३०० | १ | १ | ० | ० | २ |
| १२ | समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय) | एस -१४ : ३८,६००-१,२२,८०० | २ | २ | १ | ० | ५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | रोखपाल | एस -१३ : ३५,४००-१,१२,४०० | १ | ० | ० | ० | १ |
| १४ | वरिष्ठ सहाय्यक | एस -१३ : ३५,४००-१,१२,४०० | ७ | ३ | ४ | १ | १५ |
| १५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | एस -१३ : ३५,४००-१,१२,४०० | ४ | ४ | २ | ० | १० |
| १६ | इ.सी.जी. तंत्रज्ञ | एस -१३ : ३५,४००-१,१२,४०० | २ | १ | १ | ० | ४ |
| १७ | क्ष-किरण तंत्रज्ञ | एस -१३ : ३५,४००-१,१२,४०० | ४ | ४ | २ | ० | १० |
| १८ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १ | १ | १ | ० | ३ |
| १९ | प्रक्षेपक | एस -६ १९,९००-६३,२०० | ० | १ | ० | ० | १ |
| २० | ग्रंथसुचिकार | एस -६ १९,९००-६३,२०० | ० | १ | ० | ० | १ |
| २१ | वरिष्ठ लिपिक | एस -८ २५,५००-८१,१०० | ४ | ३ | ४ | २ | १३ |
| २२ | कनिष्ठ लिपिक | एस -६ : १९,९००-६३,२०० | ९ | ५ | ६ | २ | २२ |
| २३ | ग्रंथपाल सहायक | एस -६ : १९,९००-६३,२०० | १ | १ | १ | ० | ३ |
| | | **एकूण** | **३८** | **२८** | **२२** | **५** | **९३** |
| | | **एकूण नियमित पदे** | **८८** | **६०** | **३०** | **७** | **१८५** |
| | | **विद्यार्थी पदे** | | | | | |
| २४ | वरिष्ठ निवासी (सेवा) | २५००० + प्रचलित दराने महागाई भत्ता | ३८ | १२ | १ | ८ | ५९ |
| | | **एकूण** | **३८** | **१२** | **१** | **८** | **५९** |
| | | **एकत्रित एकूण** | **१२६** | **७२** | **३१** | **१५** | **२४४** |

## विवरणपत्र-ब (बाह्यस्त्रोताने)

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | चतुर्थ वर्ष | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| २५ | छायाचित्रकार | ० | १ | १ | ० | २ |
| २६ | कलाकार | १ | १ | ० | ० | २ |
| २७ | सहाय्यक ग्रंथपाल | १ | १ | २ | ० | ४ |
| २८ | सांकेतिक लिपिक | ० | २ | १ | १ | ४ |
| २९ | कनिष्ठ लिपिक | १० | ५ | ५ | ६ | २६ |
| ३० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ४ | ४ | ३ | ० | ११ |
| ३१ | इ.सी.जी. तंत्रज्ञ | ४ | ४ | ३ | ० | ११ |
| ३२ | क्ष-किरण तंत्रज्ञ | ४ | ४ | ३ | ० | ११ |
| ३३ | प्रयोगशाळा सहाय्यक | १० | ६ | ४ | ६ | २६ |
| ३४ | समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय) | २ | २ | १ | ० | ५ |
| ३५ | सुतार | १ | ० | ० | ० | १ |
| ३६ | प्लंबर | १ | ० | ० | ० | १ |
| ३७ | आरोग्य अनुशासक | ० | १ | १ | १ | ३ |
| ३८ | आरोग्य उपनिरीक्षक | ० | २ | २ | १ | ५ |
| ३९ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | ५ | ५ | ७ | ० | १७ |
| ४० | लघुटंकलेखक | २ | २ | २ | ० | ६ |
| ४१ | वाहन चालक | २ | २ | ० | ० | ४ |
| ४२ | सुरक्षारक्षक | ५ | ४ | ४ | ३ | १६ |
| ४३ | दप्तरी | २ | २ | ० | ० | ४ |
| ४४ | शिपाई | ४ | २ | २ | ० | ८ |
| ४५ | हमाल | १ | ० | ० | ० | १ |
| ४६ | सफाईगार | १२ | १२ | १२ | ० | ३६ |
| | **एकूण पदे** | **७१** | **६२** | **५३** | **१८** | **२०४** |